परदेशातल्या प्रियजनांना राहते घराच्या चवीची ओढ,
DTDC करेल तुमच्या प्रियजनांची दिवाळी गोड...
वर्षातल्या सर्वात मोठ्या सणाला घरापासून लांब असण्याचं दुःख आम्ही समजू शकतो...
तुमचे प्रियजन घरी येऊ शकत नसले म्हणून काय झाले? तुमच्या हातचे फराळ तर त्यांच्यापर्यंत आम्ही नक्कीच पोहोचवू शकतो. तेही अगदी माफक दरात...
आपल्या अखंड सेवेत, DTDC कुरियर, कळंब.
: अधिक माहितीसाठी संपर्क :
मो.९४०४५११५१८/८९८३८९७०८९
DTDC एक्सप्रेस कुरियर सर्व्हिसेस, कळंब
छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल, सुनील मार्केट, गाळा नं.२७, कळंब ४१३५०७

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, बुधवार, दि.१६ ऑक्टोबर २०२४

वर्ष : ०४, अंक : ६३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

## महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर, देवेंद्र फडणवीसांची पोस्ट चर्चेत

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक जाहीर झाली आहे. इतक्या दिवसांपासून महाराष्ट्राची निवडणूक कधी जाहीर होणार? ही तारीख गुलदस्त्यात होती. आज निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषद घेत निवडणुकीची तारीख जाहीर केली आहे. यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी एका शब्दात प्रतिक्रिया दिली आहे.



**महाराष्ट्रात कधी होणार निवडणूक?**

महाराष्ट्रात एका टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहे. २० नोव्हेंबरला एका टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहेत. तर २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी ही माहिती दिली आहे. गॅझेट नोटिफिकेशनची तारीख २२ ऑक्टोबर असेल तर २९ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख असेल. ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी केली जाणार आहे. तर अर्ज मागे घेण्याची तारीख ४ नोव्हेंबर २०२४ अशी असणार आहे. २० नोव्हेंबरला महाराष्ट्राची निवडणूक एका टप्प्यात होईल. तर २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागेल.

**महाराष्ट्राची निवडणूक जाहीर होताच देवेंद्र फडणवीस यांची पोस्ट काय?**

शंखनाद! या एका शब्दांत देवेंद्र फडणवीस यांनी पोस्ट केली आहे. या पोस्टसह देवेंद्र फडणवीस यांचा एक व्हिडीओही पोस्ट करण्यात आला आहे. जिस गतीसे है चला तू उस गती को पायेगा.. या गाण्यावरचा एक व्हिडीओ पोस्ट करण्यात आला आहे. त्यात देवेंद्र फडणवीस यांचे आक्रमक अंदाज दिसत आहेत. लोकसभा निवडणुकीत म हायुतीला अवघ्या १७ जागा मिळाल्या. ते अपयश धुवून काढण्यासाठी देवेंद्र फडणवीस तयार आहेत असंच ते या पोस्टमधून सांगत आहेत असंच दिसून येतं आहे.

**देवेंद्र फडणवीस यांची दुसरी पोस्ट काय?**

लोकशाहीतील सर्वोच्च महोत्सवाची आज घोषणा झाली. दिवाळीत प्रकाश पर्व असेल ! आणि पाठोपाठ दुसरे विकासाचे प्रकाशपर्व आपण २० नोव्हेंबरला एकत्र साजरे करू! भाजपाच्या नेतृत्वात आपण २०१४, २०१९ ला भरभरून यश दिले, संपूर्ण बहुमत दिले. चला पुन्हा सारे मिळून सोबत येऊ या आणि २३ नोव्हेंबरला महायुतीच्या विजयाचा जल्लोष करू या! या लोकउत्सवात आपणही सारे मोठ्या संख्येने सहभागी व्हा! विकासासाठी महाराष्ट्र तुमच्या आशिर्वादाची आणि भक्कम जनादेशाची वाट बघतोय. अशी पोस्टही देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची तारीख आणि निकाल या दोन्हीची तारीख जाहीर झाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज ही घोषणा केली. गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात निवडणूक कधी जाहीर होणार? याच्या चर्चा रंगल्या होत्या. काही दिवसांपूर्वी राजीव कुमार यांनी पत्रकार परिषद घेतल २६ नोव्हेंबरच्या आधी निवडणूक घेतली जाईल असं म्हटलं होतं. आज अखेर या निवडणुकीची आणि निकालाच्या दिवसाची घोषणा झाली आहे. २० नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक एका टप्प्यात घेतली जाईल तर २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे. एकीकडे महाविकास आघाडीने १७० ते १८० जागा मिळतील असा दावा केला आहे. तर महायुतीने आमचंच सरकार येईल असं म्हटलं आहे. या सगळ्यामध्ये नेमकं काय घडणार ते आता २३ नोव्हेंबरला स्पष्ट होणार आहे.

## आदर्श आचारसंहिता लागू : ४ विधानसभा मतदारसंघात १४ लक्ष मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१५, धाराशिव :** महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ चा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने आज जाहिर केला आहे.हा निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्याने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ ची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

जिल्ह्यात सर्व विधानसभा मतदारसंघात या सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता आजपासून लागू झाली आहे.या निवडणुकीत जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघातील एकूण १४ लक्ष २ हजार ३२५ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी आज १५ ऑक्टोबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलीस अधीक्षक संजय जाधव,उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव व संबंधित नोडल अधिकारी उपस्थित होते.




निवडणूकीच्या अनुषंगाने भरारी पथके तात्काळ गठीत करण्यात येत आहे,असे सांगून डॉ. ओंबासे म्हणाले की,विधानसभा मतदारसंघनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर एक खिडकी योजनेतून उमेदवारांच्या प्रचरविषयक बाबींना मंजुरी व परवानगी देण्यात येणार आहे.मागील विधानसभा निवडणुकीत ६५ टक्के मतदान झाले.या निवडणुकीत ७० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान होण्यासाठी मतदार जागृती कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.तसेच राजकीय पक्ष आणि प्रसार माध्यमांनी देखील सहकार्य करावे.असे आवाहन याप्रसंगी डॉ.ओंबासे यांनी केले.

निवडणूकीसाठी लागणाऱ्या आवश्यक मनुष्यबळाचे नियोजन केले आहे असे सांगून डॉ.ओंबासे म्हणाले,म तदारांना २९ ऑक्टोबरपर्यंत मतदार म्हणून नावनोंदणी करता येईल. विविध अँपचा उपयोग निवडणूक यंत्रणांना आणि उमेदवारांना निवडणूकविषयक कामासाठी करता येणार आहे. जिल्ह्यात ६ क्रिटिकल मतदान केंद्र आहे.म तदारांना त्यांचे कोणत्या मतदान केंद्रावर मतदान आहे याची माहिती असलेली चिठ्ठी (स्लिप) ही मतदानाच्या ३ ते ४ दिवस अगोदर मतदाराला देण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे डॉ. ओंबासे यांनी यावेळी सांगितले.

राज्यात २८८ विधानसभा मतदान संघासाठी एकाच दिवशी म्हणजे बुधवारी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार असल्याचे सांगून डॉ. ओंबासे म्हणाले,जिल्हयातील २४० - उमरगा (अनुसूचित जाती राखीव), २४१-तुळजापूर,२४२-धाराशिव आणि २४३ -परंडा या विधानसभा मतदारसंघात याच दिवशी मतदान होणार आहे.

जिल्हयातील चार विधानसभा मतदारसंघात १५२३ मतदान केंद्रावर मतदान होणार असल्याचे सांगून डॉ ओंबासे म्हणाले, यामध्ये उमरगा -३२१,तुळजापूर -४१०, उस्मानाबाद-४१६ आणि परंडा -३७६ मतदान केंद्राचा समावेश आहे.

उमरगा विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ६५ हजार ७७४ पुरुष,१ लक्ष ४८ हजार ९०६ स्त्री,९ तृतीयपंथी आणि भारतीय सैन्य दलात जिल्ह्यातील कार्यरत असलेले ६७४ मतदार असे एकूण ३ लक्ष १५ हजार ३३३ मतदार, तुळजापूर विधानसभा मतदारसंघात २ लक्ष ५५४ पुरुष, १ लक्ष ८१ हजार २९० स्त्री,७ तृतीयपंथी व भारतीय सैन्यतील ६१६ मतदार असे एकूण ३ लक्ष ८२ हजार ४६७ मतदार,उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ९५ हजार ८३८ पुरुष,१ लक्ष ७७ हजार ६३८ स्त्री,१७ तृतीयपंथी व भारतीय सैन्यातील असलेले ६३० मतदार असे एकूण ३ लक्ष ७४ हजार १२३ मतदार आणि परंडा विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ७४ हजार ७६१ पुरुष,१ लक्ष ५४ हजार ८३६ स्त्री,६ तृतीयपंथी आणि ७९९ भारतीय सैन्यात असलेले जिल्हयातील मतदार असे एकूण ३ लक्ष ३० हजार ४०२ मतदार असे एकूण १४ लक्ष २ हजार ३२५ मतदार मतदानांचा हक्क बजावणार असल्याचे डॉ.ओंबासे यांनी सांगितले.

## पुण्यात अजित पवार गटाला धक्का ! ६०० पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

**दि.१५, पुणे :** मागील कित्येक महिन्यापासून राज्यपाल नियुक्त विधान परिषद आमदारांच्या नियुक्तया प्रलंबित होत्या. या नियुक्त्या कधी होणार याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागून राहिले असताना विधानसभा निवडणुकीचा आचारसंहिता कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वी काही तास अगोदर महायुतीकडून राज्यपालांकडे सात नावे पाठविण्यात आली होती. त्या सात सदस्यांच्या नावांना राज्यपालांनी सहमती दर्शविल्यानंतर आज उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी या सर्व सदस्यांना आमदारकीपदाची शपथ दिली.

हेमंत पाटील, शिवसेना (एकनाथ शिंदे), मनिषा कायंदे, शिवसेना (एकनाथ शिंदे), पंकज भुजबळ राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), इद्रिस इलियास नाईकवाडी, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), महंत बाबुसिंग महाराज, बंजारा समाजाचे धर्मगुरु (भाजपा), विक्रांत पाटील (भाजपा), चित्रा वाघ (भाजपा) यांचा विधान परिषदेवर पाठवण्यात आले आहे. या



राज्यपाल नियुक्त आमदारकीवरून महायुतीमधील अजित पवार गटामध्ये नाराजी पाहण्यास मिळत आहे. अजित पवार गटाचे पुणे शहर अध्यक्ष दीपक मानकर यांना राज्यपाल नियुक्त आमदारकी देण्यात आली नाही. त्या पार्श्वभूमीवर अजित पवार गटाचे पुणे शहर उपाध्यक्ष दत्ता सागरे यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. मागील दीड वर्षाच्या काळात दिपक मानकर यांनी मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम घेऊन पक्ष शहर पातळीवर कायम चर्चेत ठेवले आहे.

दिपक मानकर कुठे कमी पडले हे पक्ष नेतृत्वाने सांगावे, पक्षातील एका वरिष्ठ नेत्यांच्या कुटुंबात किती पदे देणार, असे म्हणत नाव न घेता छगन भुजबळ यांचे चिरंजीव पंकज भुजबळ यांच्या आमदारकीवर देखील आक्षेप घेण्यात आला. तसेच महिला प्रदेश अध्यक्षपद आणि महिला आयोगाचे अध्यक्षपद एकाच व्यक्तीला. त्या पाक्षातील इतर नेत्यांना मोठे होऊ देत नाही, असा आरोप नाव न घेता रुपाली चाकणकर यांच्यावर करण्यात आला. यासह अनेक मुद्दे या बैठकीत उपस्थित करित रुपाली चाकणकर यांच्याबाबत देखील पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. बैठकीत ६०० प्रमुख पदाधिकाऱ्यांनी एकम ताने पदाचा राजीनामा देत यापुढील काळात केवळ कार्यकर्ता म्हणूनच काम करणार असल्याचे जाहीर केले. तसेच येत्या दोन दिवसांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन आमची गाऱ्हाणी मांडणार असल्याचे देखील पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## अभिनेता अतुल परचुरे यांना मुख्यमंत्र्यांची श्रद्धांजली

**अक्षराज : जे. के. पोळ**



**दि.१५, ठाणे :** हरहुन्नरी, अभिनय संपन्न अभिनेते अतुल परचुरे यांची अकाली एक्झिट मनाला चटका लावून जाणारी आहे. त्यांच्या निधनामुळे एका गुणी कलाकाराला आपण मुकलो आहोत, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनेता अतुल परचुरे यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, बालरंगभूमी पासून त्यांची अभिनयाची कारकीर्द सुरू झाली. त्यांनी मराठी रंगभूमीवर आपल्या सहज, टवटवीत अभिनयाने छाप उमटवली. मराठी आणि हिंदी अशा दोन्हीतील नाटक, मालिका चित्रपट आणि जाहिरात या क्षेत्रांत त्यांनी ओळख निर्माण केली. शाब्दिक, वाचिक विनोद यांमध्ये त्यांनी अंगभूत गुणांनी रंग भरले. त्यांच्या निधनामुळे एक गुणी, अभिनय संपन्न कलाकाराला आपण मुकलो आहोत. ही कला क्षेत्राची मोठी हानी आहे. परचुरे यांच्या असंख्य चाहत्यांपैकी एक म्हणून मी त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे. ईश्वराने त्यांना हे दुःख सहन करण्याचं बळ द्यावी अशी प्रार्थना करून मुख्यमंत्र्यांनी ज्येष्ठ अभिनेते अतुल परचुरे यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

## गावालागतच्या शेत-शिवारात वाघोबाचे मुक्त संचार ; वनविभागचे दुर्लक्ष

**अक्षराज : आकाश जयस्वाल**



**दि.१५, किनवट (नांदेड) :** माहूर -किनवट तालुक्यातील करंजी शिवारात शेतकरी संतोष चौधरी आपल्या नेहमीप्रमाणे शेतात काम करण्यासाठी गेले असता अचानकपणे त्याच्यावर वाघाने हल्ला चढवला यामध्ये शेतकरी संतोष चौधरी जखमी झाले. त्यांचा उपचार सारखनी येथील सह्याद्री खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहे. वाघाने हल्ला चढवला त्यावेळी लगतच्या शिवरातील शेतमजूर गोळा होऊन गलबला केल्याने वाघाने तिथून पळ काढला त्यामुळे जीवितहानी टळली.

आज सकाळी पुन्हा सारखनी-दहेली गावालगतच्या शेतशिवारात वाघोबा दिसल्याने शेतकरी शेतमजूर यांच्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने तात्काळ या प्रकरणात लक्ष द्यावे असे नागरिकांचे मागणी आहे.

## गावालागतच्या शेत-शिवारात वाघोबाचे मुक्त संचार ; वनविभागचे दुर्लक्ष

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथे पूर्व वैमनस्यातून एका युवकावर धारदार शस्त्राने वार करून जखमी केल्याची घटना विंचूर येथील गणेश चौकात घडली आहे. नवरात्र उत्सव दांडिया खेळताना ही घटना घडली असून, जखमी युवकावर नाशिक येथे खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. जखमी युवकाच्या फिर्यातीवरून चौघांवर लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार दि.१२ ऑक्टोंबर रोजी रात्री बाराच्या वाजेच्या सुमारास गणेश चौक येथे नवरात्रीनिमित्त दांडिया रास सुरू होता. यावेळी मागील कुरापत काढून सचिन चेवले, पप्पू चेवले, राज चेवले, विनायक चेवले आणि सार्थक वाघवकर, श्रावण वाघवकर यांच्यात हाणामारी झाली. यावेळी श्रावण यास मारहाण केल्याचा जाब विचारला सार्थक गेला असता सचिन चेवले यानी सार्थक वाघवकर यास बटनाच्या चाकूने वार करून जखमी केले. सार्थक वाघवकर गंभीर जखमी झाल्याने, त्यास नाशिक येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. सार्थक ने दिलेल्या फिर्यादी वरून सचिन चेवले, राज चेवले, पप्पू चेवले, विनायक चेवले यांच्याविरुद्ध लासलगाव पोलीस ठाण्यामध्ये भारतीय न्याय संहिता क १०९, ११५, (२), ३५२, ३५१(२) ३५१(३), ३(५) याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आप्पासाहेब हंडाळ, पोलीस हवालदार अरुण डोंगरे तपास करीत आहे.

## नाशिक जिल्हा परिषदेत ८१२ उमेदवारांना नियुक्तीचे आदेश

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, नाशिक :** जिल्हा परिषदेच्या सरळसेवा पदभरती २०२३ अंतर्गत पात्र ठरलेल्या ८१८ उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्यात आले असून यामध्ये पेसा क्षेत्रातील ६४६ तर, बिगर पेसा क्षेत्रातील १७२ उमेदवारांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदांमधील पदभरती करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. पाच ऑगस्ट २०२३ रोजी याबाबतची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. जिल्हा परिषदेच्या विविध संवर्गातील पदे भरण्यासाठी शासनाने आयपीबीपीएस संस्थेशी करार केला होता. आयपीबीपीएस संस्थेकडून विविध संवर्गातील पदांसाठी परीक्षा घेण्यात आली.

सदर संस्थेकडून परीक्षेचा निकाल प्राप्त झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर टाकण्यात आला. गुणानुक्रमे उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या मूळ शैक्षणिक कागदपत्रांची पडताळणी करुन गुणवत्तेनुसार अंतिम निवड व अंतिम प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली. अंतिम यादीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. तसेच शिक्षकांची रिक्त पदे पवित्र पोर्टलव्दारे भरण्यात आली आहेत.

२

# अक्षराज

बुलडाणा, बुधवार, दि.१६ ऑक्टोबर २०२४

विविधा

# संपादकीय



## अन्नाची नासाडी : सामाजिक गुन्हा



१६ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक अन्न दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरात विविध दिन उत्साहात साजरे केले जातात. त्यापैकी अन्न दिन महत्वाचा मानावा लागेल, कारण त्याचा थेट मानवी जीवनाच्या आस्तित्वाशी संबंध आहे. अन्न सुरक्षेबाबतची एकंदर परिस्थिती पाहता अन्न दिनाबाबत जागरूकता वाढीस लागण्याची गरज आहे. परंतु आजही आपण अन्न सुरक्षेबाबत आणि अन्नाच्या नासाडी बाबत गंभीर नाहीत असेच म्हणावे लागेल.


अन्न हे पूर्णब्रह्म आहे अशी आपली संस्कृती सांगते पण ही संस्कृती आपण विसरत चाललो आहे की काय असा प्रश्न पडावा असा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. संयुक्त राष्ट्रे पर्यावरण कार्यक्रम आणि भागीदार संस्था डब्ल्यूआरएपी चा अहवालानुसार आपल्या देशात दरवर्षी ६८ दशलक्ष टन धान्याची नासाडी केली जाते. यातील ६१ टक्के अन्न घरातून, २६ टक्के अन्न सेवांमधून तर १३ टक्के अन्न किरकोळ क्षेत्रात वाया जाते. भारतासारख्या कृषिप्रधान देशात इतक्या मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाणे ही भूषणावह बाब नाही. भारतासारख्या विकसनशील देशात जिथे दररोज साठ टक्के लोक उपाशी किंवा अर्धपोटी झोपतात तिथे अन्नाची अशी नासाडी परवडणारी नाही. वाया जाणारे हे अन्न जर गोरगरिबांच्या, भुकेल्यांच्या मुखात पडले तर देशात कोणीही उपाशी झोपणार नाही पण आपल्याला आपल्या संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. आपल्याला हवे तेवढेच अन्न पानात काढून घ्यायचे आणि तेवढेच खायचे अशी आपली परंपरा आहे. खाऊन माजावे पण फेकून माजू नये अशी आपली आजी सांगायची हेही आपण विसरून गेलो आहोत. पाश्चात्य देशात हॉटेलातही पानातले अन्न टाकणे हा सामाजिक गुन्हा मानला जातो. भुकेने व्याकुळ झालेल्या लोकांची आठवणही अन्न टाकून देणाऱ्या या सोकावलेल्या श्रीमंतांना येत नाही. अन्नाची नासाडी हा सामाजिक गुन्हा आहे याचे भान अन्न टाकून देणाऱ्या श्रीमंतांना राहिले. नाही. पोटातील भुकेची आग भागवण्यासाठी देशातील कोट्यवधी लोक भीक मागतात. आदिवासी, दुर्गम भागात आजही लाखो लोक पुरेसे अन्न मिळत नाही म्हणून कुपोषित आहेत तर दुसरीकडे दररोज लाखो टन अन्न फेकून दिले जाते ही विसंगती बदलायला हवी. वाया जाणारे हे अन्न गोरगरिबांच्या मुखात पडेल अशी व्यवस्था असायला हवी. हैदराबाद, चेन्नई, दिल्ली, कोलकाता, मुंबई, बंगळुरु यासारख्या मोठ्या शहरात हॉटेल, रेस्टॉरंट, घरात उरलेले अन्न गरिबांना मिळावे यासाठी कम्युनिटी किचन ही संकल्पना अमलात आणली गेली. या संकल्पनेनुसार शहरातल्या विविध भागातल्या रस्त्यावरच्या कम्युनिटी किचन च्या केंद्रातल्या मोठ्या फ्रीजमध्ये उरलेले अन्न ठेवले जाते. भुलेल्यांनी ते काढून घ्यावे अशी सुविधा या केंद्रात आहे पण ही संकल्पना शहरातील मोठ्या शहरातच आहे, ती ही व्यापक नाही.

कम्युनिटी किचन सारखी संकल्पना प्रत्येक शहरात व्यापक स्वरूपात राबवायला हवी म्हणजे वाया जाणारे अन्न भुलेल्यांच्या मुखात जाईल आणि अन्नाची नासाडीही थांबेल.

# पांढरी काठी : अंधांची आयडेण्टिटी

१५ ऑक्टोबर हा दिवस जागतिक अंध दिन- पांढरी काठी दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. नियतीने डोळ्यातल्या प्रकाशज्योती हिरावून घेत ज्या अंध बांधवांचे आयुष्य अंधःकारमय करून टाकले आहे, त्यांच्या जीवनात यंदाची दिवाळी आशेचा किरण आणेल अशी, आपण प्रार्थना करू या. डोळ्यावर काळा चष्मा अन् हातात पांढरी काठी घेऊन रस्ता ओलांडणारे, चालत्या रेल्वेत खेळणी विकणारे अंध बांधव आपण पहातो. त्यांच्या हातातली वरचा भाग लाल व खालच्या बाजूला पांढरी असलेली पांढरी काठीच आता त्यांची जीवनरेखा- लाईफ लाइन म्हणून राहिली आहे. अंध बांधवांना अंधःकारमय जीवनातून मार्ग काढण्यासाठी पांढरी काठी ही नॅशनल असोसिएशन ऑफ ब्लाईंड- नॅब या समाजसेवी संस्थेने बहाल केली आहे. अंध व्यक्तींना दिशा दाखविण्याचे काम ही पांढरी काठी करते. समाजाला अधिक संवेदनाक्षम, सहृदय होण्याचा एकप्रकारे संदेश ही पांढरी काठी देत असते. डोळा हा अवयव शरीरात असूनही तो निकामी झालेल्या या मंडळींसाठी पांढरी काठी म्हणजे त्यांना लाभलेले एक अवयवच आहे. अंधबांधवांचा खचलेला आत्मविश्वास या पांढरी काठीने वाढविला आहे. आता तर ती त्यांची आयुष्याची साथीदार झाली आहे.

अल्युमिनियमची काठी ११० रुपये व लाकडी काठी २४ रुपये या मुळ किंमतीत नॅबतर्फे ना नफा ना तोटा तत्त्वावर उपलब्ध करून दिल्या जातात. अंध व्यक्तीचे डोळे समोरच्या व्यक्तीला विद्रूप दिसू नये, म्हणून काळा चष्मा अवघ्या १५ रुपयात उपलब्ध करून दिला जात असतो. गेल्या काही वर्षांपूर्वी अंध व्यक्तीला कुणाच्या तरी आधाराची गरज भासत होती. कारण एकच की, त्यांच्यात आत्मविश्वासाचा अभाव! मात्र ६ ऑक्टोबर १९६४ला हा दिवस पांढरी काठी सुरक्षा दिवस म्हणून




साजरा करण्याचा निर्णय घेतला गेला आणि जगभरातल्या बहुतेक देशांनी आपापले स्वतंत्र कायदे करून पांढर्या काठीला अंधांची ओळख- आयडेण्टिटी म्हणून मान्यता दिली. १५ ऑक्टोबर हा दिवस जगभर पांढरी काठी सुरक्षा दिवस म्हणून साजरा होऊ लागला आहे. आज साधारणपणे छातीपर्यंत उंचीची, एकसंघ किंवा घडीची पांढरी काठी हातात घेतल्यामुळे पुढे येणारे चढउतार, दगडधोंडे, खाचखळगे, कुत्रे-मांजर असे प्राणी, बसलेली- झोपलेली माणसे असे काठीच्या परिक्षेत्रात येणारे सगळेच अडथळे त्या अडथळ्यांपर्यंत पोहोचण्या आधीच काठीमुळे त्यांच्या सहज लक्षात येतात. परिणामी घरातून बाहेर पडणार्या या व्यक्तींना शाळा-कॉलेज, नोकरीव्यवसायाच्या ठिकाणी, बाजार किंवा हव्या असलेल्या ठिकाणी जाऊन इच्छित कार्य साध्य करणे आता या पांढर्या काठीमुळे सहजशक्य झाले आहे. अंध बांधवांना संवेदना हेच विशेष इंद्रिय परमेश्वराने बहाल केले आहे. अशा व्यक्तींना दिसत नाही, मात्र ते अतिशय सूक्ष्म आवाज-स्वर कानाने ऐकू शकतात, तीक्ष्ण घ्राणेंद्रिय- नाकाने परिसराचा वास घेवू शकतात आणि अचूक स्मरणातही ठेऊ शकतात. दृष्टी नसल्याने निसर्गाने त्यांना जणू जास्त संवेदनेचे विशेष इंद्रिय बहाल केलेले असावे. टाचणी वा सुई खाली पडली तरी त्यांना तिचा आवाज येऊ शकतो. त्वचा, नाक, कानाचा सहाय्याने ते परिसराची माहिती देऊ शकतात. उदा. रेल्वेगाडीचा वेग कमी झाला की पुढे स्टेशन येणार हे ते सहज ओळखतात. काठीच्या आधाराने ते रस्ता खडबडीत आहे की दलदल हेही ते ओळखतात. एखाद्या वनस्पतीच्या, रसायनाच्या विशिष्ट वासावरून आपण याच भागात पुन्हा वा परत आलो आहोत, हे ते सांगू शकतात. अंध मुले-मुली सेंटर लेथ मशिनवर या ऍल्युमिनियम पाईपची निर्मिती करतात. मुंबई, पुणे, नाशिक, डेहराडून आदी ठिकाणी त्याचे कारखाने आहेत. पांढऱ्या काठीने चालण्या-वागण्यातली स्वयंपूर्णता अंध बांधवांना दिली. मात्र जगण्यासाठी आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होणेही तितकेच महत्त्वाचे असते. यासाठीच १९९५मध्ये अपंग कायद्यानुसार ज्या प्रमाणे अपंगांना शासकीय नोकर्यांमध्ये तीन टक्के आरक्षण जाहीर झाले आहे. त्यात १० टक्के अंधांसाठी आरक्षित आहे. मात्र कल्याणकारी म्हणवून घेणार्या शासनाने आतापर्यंत अंधांना वंचीतच ठेवले आहे, हे विशेष!

पांढर्या काठीच्या आधारावर जीवनाशी दिनरात संघर्ष करणार्या अंध बांधवांना आज दया किंवा सहानुभूतीची नाही तर संधीची गरज आहे. ती शासन, समाज, सामाजिक संस्था, सहकारी संस्था, सेवाभावी व्यक्ती, संस्था व मंडळे यांनी दिली तरच त्यांच्या जीवनात दिवाळीचा लखलखाट होईल, यात दुमत नाहीच!

**- संकलन व सुलेखन -**

**श्री.कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**गडचिरोली, फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.**

# डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीदिनी महापालिकेतर्फे अभिवादन



**दि.१५ कल्याण (ठाणे) :** डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जयंती दिनी महापालिका मुख्यालयात माहिती व जनसंपर्क विभागाचे उप आयुक्त संजय जाधव यांनी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उप आयुक्त अतुल पाटील, कार्यकारी अभियंता योगेश गोटेकर, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, मुख्य स्वच्छता अधिकारी वसंत देगलुरकर, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, सहा. सुरक्षा अधिकारी सुरेश पवार तसेच उपस्थित असलेल्या इतर अधिकारी/कर्मचारी वर्गानेदेखील डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.

## युनिव्हर्सिटी..

कार्यालया अनिवार्य
तक्रारसूचनांची पेटी
उपाय असे चपलख
सुधार करण्या साठी

नियम म्हणून केवळ
नको कारवाई लाठी
सकारात्मक विचारा
विचार सरणी सुलटी

व्यक्तव्हायची सुसंधी
हळूवार आली ओठी
जणू अमोल खजिना
नाही ही कागदीदाटी

घालवे संभ्रम सगळा
मार्गदर्शक ही दिवटी
लक्ष द्या समयसूचक
जाणावी आद्य ड्युटी

कळती काय अपेक्षा
ग्राहक मनीच्या गोष्टी
कुणा कसली तसदी
कोण त्रासलेला कष्टी

झटापट करे निपटारे
खास नेमावी कमिटी
सुधारावी ग्राहकसेवा
जाणा ही युनिव्हर्सिटी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# ५०, १००, २०० च्या मुद्रांक बंद करणे सर्वसामान्यांना परवडणारे नाही - स्वप्निल जाधव

**अक्षराज : जयराम देमगुंडे**
**दि.१५, उदगीर (लातुर) :** महाराष्ट्र सरकारने निवडणुकीवर डोळा ठेवून वेगवेगळ्या योजनांची घोषणा केली आहे. त्या योजनांना कमी पडणारा पैसा उपलब्ध करण्यासाठी सर्वसामान्य माणसांचा खिसा कापण्याचा प्रकार चालू आहे कमी पैशाचे मुद्रांक बंद करून चक्क पाचशे रुपयांचा मुद्रांक यापुढे चालणार असल्याचा मंत्रिमंडळामध्ये निर्णय झाला आहे. ही बाब सर्वसामान्य माणसाला, गोरगरीब विद्यार्थ्यांना, शेतकऱ्यांना इतकेच नाही तर शासनाच्या लाडक्या बहिणींना देखील परवडणारी नाही. असे युवा नेते स्वप्निल जाधव यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले आहेत.

लाडक्या बहिणी सारख्या लोकप्रिय योजनांचा पाऊस पाडत सरकारने सर्वसामान्यांची आर्थिक घडी विस्कटून टाकण्यासाठीच की काय? पन्नास रुपये, शंभर रुपये आणि दोनशे रुपयांचा मुद्रांक बंद करण्याचा निर्णय शासनाने मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला आहे. परिणामी पन्नास, शंभर, दोनशे रुपयांच्या मुद्रांक वर होणाऱ्या कामासाठी आता ५०० रुपयांचा मुद्रांक खरेदी करावा लागणार आहे.

परिणामतः एका एका मुद्रांक मागे तब्बल ४०० रुपये अधिकचे मोजावे लागणार आहेत. महायुतीच्या लोकप्रिय योजनांचा सपाट्याची झळ थेट सामान्य माणसाच्या खिशाला बसत आहे. हे अत्यंत चुकीचे असल्याचेही स्वप्निल जाधव यांनी व्यक्त केले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री लाडका भाऊ योजना, आनंदाचा शिधा, मुख्यमंत्री अन्नपूर्णा, सरकार राबवत आहे. यासाठी दर महिन्याला कोट्यावधीचा बोजा सरकारच्या तिजोरीवर पडत आहे. परिणामतः निधीची कमतरता पडत असल्याने एक तर सरकार दुसऱ्या योजनात कपात करत आहे, तर दुसऱ्या बाजूला महागाईचा भस्मासुर वाढवत चालला आहे. सर्वसामान्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे, जगणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये छोट्या छोट्या कामासाठी देखील आता मुद्रांक खरेदी करायचा झाल्यास चक्क ५०० रुपयांचा मुद्रांक खरेदी



करावा लागणार आहे. जे सामान्य माणसाला परवडणारे नाही. त्यामुळे शासनाने आपला निर्णय रद्द करावा आणि सर्वसामान्य माणूस, शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी यांना नेहमी मुद्रांक खरेदी करावे लागतात. त्या लोकांना भुर्दंड कशासाठी? असा प्रश्नही स्वप्निल जाधव यांनी उपस्थित केला आहे. अगोदरच महागाईचा भस्मासुर प्रचंड गती घेत आहे. सणावाराला देखील मध्यमवर्गीयांना उत्साहाने सण साजरे करता येत नाहीत, अशी परिस्थिती आहे. एका बाजूला गरिबांना मोफत म्हणत शिधा वाटप केला जातोय मात्र त्यातही दलाल हात साफ करून घेत आहेत. या संदर्भात अनेक ठिकाणी तक्रारी झाली आहेत. हे सर्व डोळेझाक करून मध्यमवर्गीयांच्या खिशाला झळ बसेल अशा पद्धतीचे कार्य का केले जावे? हे कळत नाही.

आता शाळा सुरू झाल्या की, विद्यार्थ्यांना प्रतिज्ञापत्रासाठी असेल किंवा संचकारपत्र असेल, वाटणी पत्र असेल, पतसंस्थेच्या कामासाठी असेल, लग्न नोंदणीसाठी, भाडे तत्त्वाच्या करारासाठी असेल, घरकुला साठी सामंजस करारासाठी असेल, किंवा विविध प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रतिज्ञापत्रासाठी असेल, खरेदी विक्रीच्या व्यवहारासाठी असेल, बँक, न्यायालय इत्यादीच्या कामासाठी देखील मोठ्या प्रमाणात मुद्रांकाची गरज असते आणि ही गरज अनिवार्य असते. त्यामुळे मुद्रांकाचे किंमत वाढवून सर्वसामान्य माणसाची गळचेपी करण्याचे पाप सरकारने केले आहे, ते बदलले पाहिजे. विद्यार्थ्यांसाठी, विद्यार्थिनींसाठी तरी यामध्ये सूट मिळायला पाहिजे नाहीतर मग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रासाठी मुद्रांकाची अट रद्द करावी. अशी आग्रही मागणी स्वप्निल जाधव यांनी केली आहे.

# शिरवळ श्री क्षेत्र अंबिका माता नवरात्र महोत्सव समितीकडून नवदुर्गांचा सन्मान



**अक्षराज : बाळू धायगुडे**
**दि.१४, खंडाळा (सातारा) :** शिरवळ तालुका खंडाळा जि.सातारा येथील श्री अंबिका माता देवीचे मानकरी शिवाजीराजे देशमुख, अध्यक्ष राजेश शेटे, उपाध्यक्ष भरत गोलांडे, सचिव नंदकुमार सणस, खजिनदार प्रमोद कांबळे, सहखजिनदार दत्तात्रय कबुले, सहखजिनदार दत्तात्रय कबुले, सहखजिनदार ऋषिकेश मोहिते मार्गदर्शक बळीराम कुचेकर, मुरलीधर उबाळे, सुनील कांबळे यांनी दरवर्षीप्रमाणे महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी नवदुर्गा सन्मान सोहळा नुकताच श्री क्षेत्र अंबिका माता मंदिर शिरवळ येथे घेण्यात आला. डॉ.पूनम दिलीराज दाभोळे गव्हर्मेंट मेडिकलऑफिसर, सुजाता गायकवाड कदम मंत्रालय अप्पर सचिव मुंबई, वैशाली राजेंद्र गुजर सासूबाईंच्या स्मरणार्थ स्वतःची जागा अंगणवाडीसाठी दिली. हिना फातिमा रफिक खान डॉक्टर, वैष्णवी सुधीर जाधव मेट्रो पायलट मुंबई, संगीता गणेश कुंभार शाळेसाठी योगदान, छाया महादेव कांबळे आदर्श जाऊ बाई, कल्याणी नंदकुमार पवार प्रगतशील शेतकरी अंतर्गत विविध पिके, लक्ष्मीताई प्रकाश कुंभार अंबिका माता उत्सव योगदान या महिला नवदुर्गांचा सन्मान यावेळी करण्यात आला.

तसेच नवरात्रोउत्सव निमित्त महिलांची पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यावेळी विविध प्रकारचे रुचकर चविष्ट नाविन्यपूर्ण तसेच आधुनिकतेचा स्वाद असणारी पोषक पाककलेचे आविष्कारच महिलांनी सादर केले होते. यास परीक्षक डॉ.शितल पाटील यांनी काम पाहिले. पाककला स्पर्धेतील विजयी स्पर्धक पार्वती साहेब गौडा बिरादार यांना नवरात्र समितीकडून बक्षीस देण्यात आले. श्वेता रवींद्र हिरवे डॉक्टर पुनम दाभोळे यांस कडून बक्षीस, आशा सुमित जांभळे यांस दादासाहेब कांबळे व दादासाहेब बोडरे तंटामुक्ती समिती अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्याकडून बक्षीस यासह अनेक महिलांना अंबिकामाता समितीतर्फे उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली.

यावेळी सर्व महिलांनी समिती अध्यक्ष राजेश शेटे व देशमाने मॅडम चे मनापासून आभार मानत होत्या. या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात जेष्ठ नागरिक विविध कार्यक्षेत्रातील पदाधिकारी शिरवळ महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी अंबिकाताई देशमाने यांनी आभार प्रदर्शन केले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# अक्षराज

३ | बुलडाणा, बुधवार, दि.१६ ऑक्टोबर २०२४ | संमिश्र


# थोडक्यात

## प्राथमिक विद्यालय मोशी विद्यालयात विद्यार्थ्यांच्या कला



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, पुणे :** कौशल्याचा विकास होण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम घेण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून दिवाळी सणाचे औचित्य साधून इयत्ता -तिसरीच्या विद्यार्थ्यांना कागदी आकाशकंदील बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. त्यामागे हेतू, उद्देश पण तसाच होता कि, सर्व विद्यार्थ्यांना बदलत्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्ये विकसित व्हावीत, स्वतः काही तरी केले याचा आनंद मिळावा, नवनिर्मिती, कष्ट, व्यवहारिक दृष्टिकोन निर्माण करणे, छोटे व्यवसाय कसे केले जातात, त्यासाठी किती मेहनत घ्यावी लागते या सर्वच गोष्टींची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी हा मुख्य उद्देश होता.

त्यासाठी प्रथम सर्व विद्यार्थ्यांना विविध रंगांचे क्राफ्ट पेपर, रंगीत लेस, कात्री, विविध नक्षीचे कुंदन घेऊन येण्यास सांगितले, विद्यार्थ्यांमध्ये खूप कुतूहल होते. सकाळी सकाळी सर्व विद्यार्थ्यांना मैदानावर घेऊन आकाशकंदील कसा बनवायचा याविषयी वर्गशिक्षक कदम प्रकाश यांनी मार्गदर्शन केले. पूर्ण आकाशकंदील बनवून झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद उठून दिसत होता. मुख्याध्यापिका गवारे सुनीता यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## महाराष्ट्राचे हास्यवीरांचा माढा नगरीच्या मातीत रंगला मनोरंजनाचा थरार

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१५, माढा :** श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या संकल्पनेतून विठ्ठल प्रतिष्ठान आयोजित माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सव - २०२४' महोत्सवाच्या सलग दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राचे हास्यवीरांनी माढा नगरीच्या मातीत कलाकारांच्या हास्य, मनोरंजन आणि अदाकारीनं माढा मतदार संघातील नागरिकांना विशेष आनंद घेतला.

महत्त्वाच्या दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राचे हास्यवीर सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री भार्गवी चिरमुले व इतर कलाकारांच्या कार्यक्रमांचे सादरीकरण झाले.. आपल्या अस्सल मराठमोळ्या अंदाजात भार्गवी चिरमुले यांनी सादर केलेलं नृत्य.. रसिकांसाठी अद्वितीय ठरलं.. तर हास्य मनोरंजनाच्या कार्यक्रमात हास्यवीर अभिनेते पृथ्वीक प्रताप आणि अभिनेत्री शिवाली परब या कलाकारांनी प्रेक्षकांना अक्षरशः पोट धरून हसायला लावलं.

यासोबतच या प्रदर्शनात शेतकरी बांधवांना नवनवीन संशोधन, नवनवीन आधुनिक अवजारे, पिकांमधील नवनवीन जाती, शेतीच्या आधुनिक पद्धती याबाबत सखोल व शास्त्रोक्त मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे विठ्ठल साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सांगितले. या कार्यक्रमात नागरिकांना कृषी विषयक साहित्य पाहायला मिळत आहे. माढा मतदार संघात एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रथमच अशा पद्धतीचा कार्यक्रम होत असून माढा तालुक्यातील हजारो नागरिक याचा लाभ घेत आहेत त्याचा अभिमान आहे.

## वांगर्जे येथे अंतर्गत रस्त्यावर महाकाय पिंपळाचे झाडे उलमडून पडले



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१५, कासा (पालघर) :** डहाणू तालुक्यातील वांगर्जे पाटील पाडा येथील अंतर्गत कालव्यावरील रस्त्यावर पावसाळ्यात महाकाय पिंपळाचे झाडे वादळी वाऱ्यामुळे उलमडून पडले आहे. हे महाकाय झाडे रस्त्यावर पडल्यामुळे पाटीलपाडा, चरीपाडा, आमभ्रमण पाडा कडे जाणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय झाली आहे. मागील तीन महिन्यापासून हे झाडं कालव्याच्या रस्त्याच्या मध्यभागी पडल्याने या रस्त्यानी पायी ही जाता येत नसल्याने येथील नागरिकांना पर्यायी रस्त्याचा वापर करून वळसा घेऊन जावे लागते. याबाबत ग्रामस्थ यांनी वनविभाग तसेच स्थानिक ग्राम पंचायत यांना कळवून देखील हे झाड बाजूला केले जात नसल्याने ग्रामस्थांकडून रोष व्यक्त केला जात आहे. त्यामुळे हे झाड लवकरात लवकर बाजूला काढुन ग्रामस्थांचे येण्या जाण्यासाठी रस्त्या मोकळा करून देण्याची मागणी पाटीलपाडा ग्रामस्थ करत आहेत.

## परिक्रमाच्या सिद्धी शिर्केचे यश...




**अक्षराज : रोहन रंधवे**

**दि.१५, श्रीगोंदा :** जयपुर (राजस्थान) येथे आयोजित खेलो इंडिया अंतर्गत अस्मिता वूमन सायकलिंग लीग वेस्ट झोन ट्रॅक स्पर्धेत परिक्रमा इंजीनियरिंग प्रथम वर्ष सिव्हिल विभागाची विद्यार्थीनी कु.सिद्धी शिर्के हिने अप्रतिम कामगिरी करून वेगवेगळ्या प्रकारात दोन सुवर्णपदक एक रौप्य पदक व दोन कांस्यपदक मिळवल्याबद्दल या खेळाडूचे संस्थेचे संस्थापक, महाराष्ट्र राज्याचे माजीमंत्री माजी आमदार बबनरावजी पाचपुते, परिक्रमा शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा डॉ.प्रतिभाताई पाचपुते, सचिव विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी अॅड. प्रतापसिंह बबनरावजी पाचपुते, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी व मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.अनिल पुंड, अकॅडमी डायरेक्टर इंद्रायणी पाचपुते, अकॅडमी डेप्युटी डायरेक्टर प्रा. संजीव कदम पाटील, प्राचार्य डॉ.संजीवन महाडिक, प्राचार्य डॉ.सुनील निर्मळ, प्रा.डॉ. सुदर्शन गिरमकर, प्राचार्य डॉ. रमेश शिंदे, प्राचार्य डॉ.पांडुरंग इथापे, प्राचार्य डॉ.प्रशांत सूर्यवंशी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. या खेळाडूंना प्रा.रवींद्र काळाने, प्रा.रोहन रंधवे, यांचे मार्गदर्शन लाभले.

## एसटी बसच्या प्रथमोपचार पेटीलाच उपचाराची गरज ! शिरपूर आगार प्रमुखांचे दुर्लक्ष...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, शिरपूर :** बहुजन सुखाय बहुजन हिताय हे ब्रीद वाक्य घेऊन प्रवाशांच्या सेवेसाठी तत्पर असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या शिरपूर आगारातील बसमध्ये असलेल्या प्रथमोपचार पेट्या या नावालाच राहिलेल्या असल्याचे पाहण्यास मिळत आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये प्रवासा दरम्यान प्रवाशांना किरकोळ इजा झाली तर बसमध्ये प्राथमिक उपचार मिळावेत म्हणून एसटी महामंडळाने प्रत्येक बसमध्ये प्रथमोपचार पेटी बसवून त्यात औषध साठा ठेवला होता. यामुळे प्रवाशांना प्रवासा दरम्यान मेडिसीनची गरज भासली तर ते बसमध्येच उपलब्ध होत होते.परंतु सध्या शिरपूर आगारातील बसमध्ये असलेल्या प्रथमोपचार पेट्यांमध्ये कसलेच



औषध उपलब्ध नसल्याचे वास्तव असतांना देखील याकडे शिरपूर आगार प्रमुखांचे दुर्लक्ष होत असल्याचे पाहण्यास मिळत आहे. बसमधील प्रथमोपचार पेटीत कसलेच औषध साठा उपलब्ध नसल्याचे माहित असतांना देखील वाहक चालक तशी माहिती आगार प्रमुखांकडे लेखी स्वरूपात देत नसल्यामुळे प्रथमोपचार पेट्या औषधांविना रिकाम्याच राहत आहेत.

शिरपूर आगारातील काही बसमध्ये प्रथमोपचार पेट्या आहेत तर त्यात औषधांचा साठा नाही ? काही बसमधील प्रथमोपचार पेटीच गायब असल्याचे देखील दिसुन आले तर काही प्रथमोपचार पेट्यांमध्ये औषधांचा साठाच एक्सपायरी डेट असल्याने प्रवाशांची स्थिती इकडे आड तिकडे विहीर अशी झाली आहे. शिरपूर आगारातील ज्या बसमध्ये प्रथमोपचार पेटी नाहीत त्या बसमध्ये प्रथमोपचार पेटी बसवून त्यात औषधांचा साठा ठेवण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

## चंद्रपूर येथील महाकाली निद्रा अवस्थेत... देवीचे दर्शन घेण्यासाठी गर्दी...

**अक्षराज : बालाजी गायकवाड**

**दि.१५, हदगांव (नांदेड) :** हदगाव तालुक्यातील नागसेन नगर येथे चंद्रपूर येथील निद्रा अवस्थेमध्ये असलेली महाकाली नागसेन नगरमध्ये नवरात्र स्थापन केली. ही कल्पना करावी अशी सामाजिक कार्यकर्ता बालाजी वंजारे यांच्या मनात निर्माण झाली व त्यांनी हादगाव तालुक्यातील बामणी फाटा येथील मूर्ती कारागिराला ३ महिन्यापूर्वीच अशी म्हटले की, आम्हाला निद्रा अवस्थेची मूर्ती बनवायला सांगितले मूर्ती स्थापन करून हादगाव तालुक्यातील खेड्यापाड्यातील



भाविक भक्त खूप मोठ्या उत्साहाने निद्रा अवस्था असलेल्या देवीचे दर्शन घेण्यासाठी खूप गर्दी होत असे असे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना म्हटले आहे. सर्व मंडळांनी पूर्ण मेहनत करून भक्तासाठी एक चंद्रपूर बनवण्याचा प्रयत्न केला व त्यांना यश मिळेल आणि या देवीपाहण्या साठी रात्री दोन वाजेपर्यंत भक्ताची प्रचंड गर्दी दर्शनासाठी जमत होती.

त्यांनी असे म्हटले की, शशांक मनवर, व मार्ग मार्गदर्शक डेकोरेशन मास्टर माईड बालाजी राजाराम वंजारे व अध्यक्ष विशाल माने उपाधीक्षक देवानंद नंदे, कोषध्यश गोपाल वंजारे, सचिव सुनील धनगरे, सहसचिव गणेश नरवाडे, गोविद नरवाडे, संदीप गिरबीडे. व त्यांनी १३ ऑक्टोबर रोजी महाप्रसादाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात करण्यात आला व या महाप्रसाद चा लाभ खेड्यापाड्यातील भाविक भक्तांनी लाभ घेतला दिनांक १४ ऑक्टोबर रोजी या देवीची वाजत गाजत विसर्जनाची मि रवणूक काढण्यात आली.

## हिवरे कोरडा येथे मळगंगा देवी सुवासिनी कक्ष साकारतोय !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, पारनेर (अ.नगर) :** पारनेर तालुक्यातील हिवरे कोरडा येथे नवरात्र उत्सवात मळगंगा देवी मंदिराम ध्ये नऊ दिवस प्रचंड भाविकांची गर्दी होत असते. मळगंगा देवी ग्रामदैवत असल्याने देवीच्या दर्शनासाठी गावातील सर्व भाविक तसेच बाहेरगावी आपल्या व्यवसायानिमित्त तसेच नोकरी निमित्त गेलेले सर्वच कुटुंब येत असतात.

काही महिला व पुरुष उपवास दरम्यान मंदिरातच राहतात. त्यामुळे महिलांसाठी सर्व सुविधा असणे गरजेचे आहे. देवीच्या आरतीच्या वेळी संपूर्ण गावातील पुरुष, महिला व तरुण वर्ग भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. या गर्दीचा विचार करता ग्राम



> सुवासिनी कक्षाचे भव्य दिव्य बांधकाम तयार झाल्या नंतर नवरात्र व देवीची यात्रा महोत्सव साजरा करण्यात महिला वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. येथे सर्व सुख सोयी केल्या जाणार आहेत. ग्रामस्थांच्या सहकार्याने हे काम मार्गी लागणार ती आनंदाची बाब आहे. **-- संतोष कोरडे, संचालक हॉटेल साई नगरी**

स्थ व पदाधिकारी यांनी निर्णय घेतला भव्य व दिव्य असा सुवासिनी कक्ष मंदिराच्या मागच्या बाजूला करण्याचे ठरविले आहे या सुवासिनी कक्षाचे भुमिपुजन ह.भ.प. ज्योती सोनवणे यांचे शुभहस्ते संपन्न झाले.

महिला साठी सर्व सोयीसुविधासह सुसज्ज सुवासिनी कक्ष साकारणार आहे, ग्रामस्थांनी प्रतिसाद देत दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर ह भ प ज्योती सोनावणे यांच्या शुभ हस्ते भूमिपूजन शुभारंभ करण्यात आला. यावेळी बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. सरपंच मंगल अडसूळ उपसरपंच सुदाम कोरडे, चेअरमन बाळासाहेब कोरडे, बबन अडसूळ, संतोष अडसूळ, माजी उपसरपंच संतोष जऱ्हाड, माजी ग्रामपंचायत सदस्य संदीप कोरडे, भाऊ कोरडे, अनिल घंगाळे, राजू सुंबे, लतिका अडसूळ, सचिन अडसूळ, अंबादास वाळुंज, आदी ग्राम स्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

## वाचन संस्कृती टिकणे काळाची गरज ! ग्रंथ मित्र पुरस्काराने सन्मानित अनंत वैध यांचे प्रतिपादन

**अक्षराज : विवेक परब**

**दि.१५, सिंधुदुर्ग :** आज प्रत्येक मुलाच्या हातात मोबाईल आहे आणि त्याच्या हातातून जर मोबाईल घेतला तर त्या मुलाची होणारी घालमेल काही वेगळीच असते. मोबाईल हा आल्यापासून पालकापर्यंत सगळ्यांचा जवळचा वाटू लागला आहे आणि त्यामुळे पुस्तकी ज्ञानाची वाचन संस्कृती संपत चालली आहे की काय अशी भीती व्यक्त होत आहे. अशा स्थितीत आज पुन्हा एकदा साहित्य क्षेत्रातील व्यक्तींने शाळांमध्ये जाऊन वाचन संस्कृती विषयी प्रबोधन करणे आवश्यक आहे.



मला ग्रंथ मित्र पुरस्कार मिळाला हा पुरस्कार संपूर्ण सिंधुदुर्ग वासियांचा आहे मात्र या भागातील पाल्यांची वाचन संस्कृतीची गोडी जेव्हा खऱ्या अर्थाने निर्माण होईल. हाच खरा सन्मान असेल असे मत कोकण विभागीय राज्यस्तरीय ग्रंथ मित्र पुरस्कार प्राप्त कोकण मराठी साहित्य परिषद सिंधुदुर्ग जिल्हा शाखेचे माजी जिल्हाध्यक्ष अनंत वैद्य यांनी व्यक्त केले.

कोकण मराठी साहित्य परिषद सिंधुदुर्ग जिल्हा शाखेच्या वतीने त्यांचा शाल व श्रीफळ देऊन रविवार १३ ऑक्टोबर रोजी गौरव सन्मान करण्यात आला यावेळी व्यासपीठावर कोकण मराठी साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष मंगेश मस्के, सचिव विठ्ठल कदम, खजिनदार भरत गावडे, सावंतवाडी शाखेचे अध्यक्ष अॅड. संतोष सावंत, कुडाळ शाखेचे अध्यक्ष वृंदा कांबळी, जिल्हा कार्यकारिणी सदस्य विवेक परब, सतीश गावडे, सुरेश पवार, डॉ. दिपाली काजरेकर, संजय शिंदे, नंदन वेंगुर्लेकर, श्रीमती उषा आठले, जिल्हा ग्रंथालय संघाचे सचिव राजन पांचाळ आदी उपस्थित होते.

यावेळी. श्री वैद्य पुढे म्हणाले की म ला कोकण विभागीय ग्रंथ मित्र पुरस्कार मिळाला हा तुम्हा सर्वांचा आहे. मी जिल्हा ग्रंथालयाचा अध्यक्ष म्हणून काम केले. गेली कित्येक वर्षापासून मी ग्रंथालय साहित्य चळवळीत आहे. पण आज साहित्य चळवळ पुस्तकी वाचन प्रवृत्ती कमी होत चालली आहे. मोबाईल मधील व्हिडिओ आज सर्वांना आकर्षित करत आहेत त्यामुळे पुस्तक वाचन कमी होत चालले आहे. आणि मुलांमध्ये ही वाचन संस्कृती पुढील काळात नष्ट होईल की काय अशी भीती मला वाटत आहे. त्यामुळे सर्वांनी वाचनाची सवय लागावी यासाठी आता साहित्यिक क्षेत्रातील व्यक्तीने मुलाच्या हातातील मोबाईल मॅन संस्कृती कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करायला हवेत. तरच खऱ्या अर्थाने पुरस्कारांना अर्थ राहील. असे ते म्हणाले जिल्हाध्यक्ष मंगेश मस्के म्हणाले की ग्रंथ मित्र पुरस्कार आनंद वैद्यसर यांना मिळाला हा पुरस्कार खऱ्या अर्थाने पद्मभूषण पुरस्कारा एवढाच महान पुरस्कार आहे. पण आपल्या कोकण विभागात वैद्य सरांचा म्हणावा तसा गौरव झालेला नाही. त्याने ग्रंथालय, साहित्य, शिक्षण अशा सर्व क्षेत्रात त्यांचे योगदान फार मोठे आहे. एका चांगल्या व्यक्तीला हा पुरस्कार मिळाला आहे. संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा वासियांचा आणि साहित्य चळवळीचा हा पुरस्कार आहे. असे ते म्हणाले. यावेळी अॅड. संतोष सावंत, संजय शिंदे, वृंदा कांबळी, डॉ. दिपाली काजरेकर, भरत गावडे आदींनी आनंद वैद्य यांना कोकण विभागीय ग्रंथमित्र पुरस्कार मिळाला त्यामुळे आम्हा सर्वांना आनंद होत आहे व कोकण विभागाचा सन्मान केला गेला आहे चालते बोलते ग्रंथालय म्हणून आनंद वैद्य यांच्याकडे पाहिले जाते त्यांच्याकडे साहित्यिक दृष्टिकोन आहे आणि साहित्य चळवळ गावागावात पोहोचवण्यासाठी त्यांनी अर्पाईमेंट घेतली आहे अशा व्यक्तीचा हा गौरव झाला आहे असे ते म्हणाले. यावेळी साहित्य सांस्कृतिक मंडळावर निवड झालेल्या भरत गावडे व डॉ. दिपाली काजरेकर यांचाही सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक विठ्ठल कदम यांनी केले तर समारोप पांचाळ यांनी केला. यावेळी मोठ्या संख्येने साहित्यिक उपस्थित होते.

# ‘तलाठी’ आणि ‘कोतवाल’ यांना आता नवीन नावाची ओळख

## ब्रिटिशकालीन पदनामात शिंदे सरकारने केला बदल

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, मुंबई :** तलाठ्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम १४, ७६, १४९, १५०, १५१, १५३, १५४ या कलमात नमूद केलेली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. जिल्हाधिकारी याने नमूद केलेली नोंदणीपत्रके, रजिस्टरे व जमाखर्च लिहिण्याचे काम तलाठ्याकडे असते. जमीन महसूल व जमीन महसूल थकबाकी म्हणून सर्व रकमा त्यास गोळा कराव्या लागतात.

कोणत्याही वरिष्ठ महसूल अधिकारी किंवा पोलीस सांगेल ते गाव संबंधी लिहिण्याचे काम तलाठयास करावे लागते. महसूल विभागातील तलाठी संवर्गाच्या पदनामात बदल करून ग्राम महसूल अधिकारी असे पदनाम करण्याची विनंती महाराष्ट्र राज्य तलाठी संघ यांच्याद्वारे करण्यात येत होती.

महसूल विभागातील तलाठी संवर्गाच्या पदनामात बदल करून ग्राम महसूल अधिकारी असे पदनाम करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आज झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत महसूल विभागातील तलाठी (गट-क) संवर्गाच्या पदनामात बदल करून ग्राम महसूल अधिकारी असे पदनाम करण्यास पुढील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

### कोतवाल पदाचेही पदनामात बदल

कोतवालांना चतुर्थ श्रेणी लागू करणे आणि आणि इतर मागण्यांच्या संदर्भात मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक-२९/०८/२०२४ रोजी बैठक झाली होती. त्या बैठकीत कोतवाल हे पद ब्रिटिश काळापासून अस्तित्वात असल्याने या पदनामात बदल करून त्याऐवजी महसूल सेवक करण्याची मागणी मान्य करण्यात आली आहे. तसेच

(१) वरीलप्रमाणे पदनाम बदलामुळे भविष्यात वेतनश्रेणी वाढी संदर्भात प्राप्त होणारी कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही. तसेच, पदनाम बदलानंतर वेतनश्रेणी/ वेतन स्तर देण्याच्या अनुषंगाने भविष्यात वेतनत्रुटी समितीपुढे मागणी करता येणार नाही व अशी मागणी विचारात घेतली जाणार नाही.

२) सातव्या वेतन आयोगानुसार तलाठी या पदाची वेतनश्रेणी एस ८, रू.२५५००-८११००/- अशी आहे. तलाठी या पदनामामध्ये बदल केल्यामुळे या वेतनस्तरामध्ये अथवा वेतनश्रेणीमध्ये बदल करण्याची वा वेगळयाने वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी विचारात घेतली जाणार नाही.

(३) वरीलप्रमाणे पदनाम बदलानंतर सध्याच्या गट-क संवर्गामध्ये कोणताही बदल होणार नाही, वा गट बदला संदर्भातील कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोतवाल यांचे महसूल सेवक असे पदनाम बदलामुळे भविष्यात शासकीय कर्मचाऱ्यां नुसार वेतन श्रेणी लागू करण्याची कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही. असेही शासनाने जाहीर केलेले आहे.

# वनकुटे विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन पदाची निवड बिनविरोध

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, पारनेर (अ.नगर) :** तालुक्यातील वनकुटे येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी येथील बिनविरोध निवडून आलेले संचालक गणेश विलास मुसळे यांची तर व्हाईस चेअरमन पदी ताराबाई भानुदास गागरे यांची एकमताने बिनविरोध निवड संपन्न झाली.




निवड जाहीर होताच कार्यकर्त्यांनी वनकुटे गावातील चौकात फटाक्यांची आतिषबाजी केली. सोसायटी कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी चाबुकस्वार यांच्या अध्यक्षेखाली निवडीसाठी सोसायटीच्या नवनिर्वाचित सदस्यांची बैठक आज संपन्न झाली.

या बैठकीत या बैठकीत माजी चेअरमन भानुदास गागरे, माजी चेअरमन काशिनाथ बुचडे, माजी चेअरमन अशोक पाटील गागरे, माजी चेअरमन ज्ञानदेव गागरे, सामाजिक कार्यकर्ते तसेच तज्ञ संचालक डॉ. नितीन रांधवण, माजी चेअरमन भिवा केसकर, संचालक विठ्ठल काळनर, सुर्यभान औटी, कौशिक औटी सर, माजी सरपंच मच्छिंद्र खामकर, सोनबा गोरे, मच्छिंद्र पठारे,पारुनाथ वाबळे,सचिव बाबासाहेब धरम व आप्पा शिंदे या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

डॉ.नितीन रांधवण यांनी गणेश विलास मुसळे यांचे चेअरमन पदासाठी नाव सुचवले तर भानुदास गागरे यांनी अनुमोदन दिले. व्हॉईस चेअरमन पदासाठी अशोक पाटील गागरे यांनी ताराबाई गागरे यांचे नाव सुचविले त्यास भिवा केसकर यांनी अनुमोदन दिले. एकच अर्ज दाखल झाल्याने बिनविरोध निवड झाली. निवडीनंतर नवनिर्वाचित चेअरमन व्हाईस चेअरमन यांचा सत्कार संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आला.

चेअरमन व व्हाईस चेअरमन यांनी पुढील कार्यासाठी सर्व सोसायटीच्या सभासद व ग्रामस्थ वनकुटे - तास ग्रामस्थांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते डॉ. नितीन रांधवण, सचिन बाबासाहेब धरम, आप्पा शिंदे, मच्छिंद्र खामकर,पारुनाथ वाबळे, सोनबा गोरे मच्छिंद्र पठारे विठ्ठल काळनर, भानुदास गागरे,

ज्ञानदेव गागरे, काशिनाथ बुचडे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत आचारसंहितेचे पालन करावे - जिल्हाधिकारी कटियार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, अमरावती :** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणुकीदरम्यान सर्वांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणुकीच्या अनुषंगाने विभागप्रमुखांची बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, निवडणूक उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे आदी उपस्थित होते.

श्री. कटियार यांनी, निवडणुकीच्या अनुषंगाने तातडीने करावयाच्या कार्यवाहीमध्ये सार्वजनिक ठिकाणी असलेले राजकीय पक्षांचे झेंडे, फोटो तातडीने काढण्यात यावेत. तसेच राजकीय पक्षांनी स्वत:हून त्यांचे प्रचार साहित्य काढण्याचे आवाहन केले.

निवडणूक कालावधी हा महत्वाचा कालावधी असल्याने सर्व विभागप्रमुखांनी दक्ष राहून कारवाई करावी. कायदा आणि सुव्यवस्था राखणे आणि निवडणूक विषयक कामकाज करण्यासाठी तातडीने मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे.



शहरी भागात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप अंतर्गत कार्यक्रम घेण्यात यावेत. लोकसभा निवडणुकीमध्ये मतदानात ३ टक्के वाढ झाली आहे. ही चांगली बाब आहे. येत्या निवडणुकीत ७० टक्के मतदान होण्यासाठी सर्व यंत्रणांनी प्रयत्न करावेत. यासाठी जनजागृतीचे कार्यक्रम राबविण्यासाठी पुढाकार घ्यावा.

मतदारांना सध्यास्थितीमध्ये मतदान नोंदणी करता येणे शक्य आहे. मतदारांनी मतदान यादीमध्ये आपले नाव नसल्यास तातडीने नोंदणी करावी. यामुळे मतदानाच्या हक्कापासून कुणीही वंचित राहणार नाही. मतदारांच्या सोयीसाठी मतदान केंद्रावर विविध सुविधा देण्यात येणार आहे. मतदान केंद्रावर गर्दी होऊ नये यासाठी यावेळी अधिक मतदान केंद्र राहणार आहे.

तसेच ८५ वर्षावरील आणि दिव्यांग मतदारांना घरून मतदान करण्याची सुविधा देण्यात येणार आहे. मतदारांना त्यांचे मतदान केंद्र माहिती व्हावे, यासाठी बीएलओमार्फत चिठ्ठी वाटप करण्यात येणार आहे. यावर निगराणी करण्यासाठी विशेष सुविधा निर्माण करण्यात आली आहे.

उमेदवारांना निवडणुकीसाठी ४० लाख खर्चाची मर्यादा राहणार आहे. तसेच विविध परवानगीसाठी एक खिडकी सुविधा उपलबध राहणार आहे. सभांसाठी मैदान राखीव ठेवण्यात येणार आहे. पूर्ण तपासणीअंती मैदानाचे आरक्षण करण्यात येणार आहे. कुणालाही अगाऊ आरक्षण करून ठेवता येणार नाही. यासाठी सात दिवसाआधी अर्ज करावा लागणार आहे. रोख रक्कम वाहतूक करताना पुरावा बाळगावा, तसेच रोख रक्कम जवळ ठेवणे टाळावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी केले.

# लोकशाही संवर्धनासाठी युवकांचा मतदानात सहभाग महत्त्वाचा - जिल्हाधिकारी स्वामी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, छत्रपती संभाजीनगर :** आज आपल्याला मिळणारे स्वातंत्र्य हे लोकशाही व्यवस्थेमुळे मिळत आहे. या लोकशाहीला अधिक निकोप व बळकट करुन तिच्या संवर्धनासाठी युवकांचा मतदानात अधिकाधिक सहभाग असणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले. एमजीएम विद्यापीठात आयोजित ‘युवा संवाद’ कार्यक्रमात युवा मतदारांमध्ये मतदार जनजागृती करण्यात आली. त्याप्रसंगी जिल्हाधिकारी स्वामी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. रुक्मिणी सभागृहात आयोजित कार्यक्रमास कुलगुरु डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गडेकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, उपविभागीय अधिकारी निलम बाफना, रासेयो समन्वयक डॉ. आर.आर. देशमुख, तहसिलदार रमेश मुनलोड आदी उपस्थित होते.




जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, महाविद्यालयीन काळ हा जीवनातील सर्वोत्तम काळ आहे. शिक्षण घेऊन आपण जीवनातील आव्हाने पेलण्यासाठी सज्ज होतात. त्यासाठी शिक्षित होण्यासोबत संस्कारित होणे आवश्यक आहे. सदैव आदरस्थानी असणाऱ्या आई वडील, गुरुजनांशी सहज खोटे बोलून त्यांना फसवत असतो. मात्र ही त्यांची फसवणूक नसून आपली स्वतःची फसवणूक आहे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास हवा मात्र फाजिल आत्मविश्वास नसावा. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक आपणास ओळखता आला पाहिजे. अंतिमतः बौद्धिक विकास हाच खरा विकास आहे, असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी स्वामी पुढे म्हणाले की, आपल्या देशातील लोकशाहीमुळे प्रत्येक नागरिकाला मिळालेले अधिकार आणि कर्तव्य याची जाणीव आपणास असणे आवश्यक आहे. त्याप्रती जागरुकता येण्यासाठी युवकांनी मतदानाचा हक्क व कर्तव्य बजावायला हवे. पर्यावरण रक्षण, आरोग्य, व्यसनमुक्ती, सोशल मिडियावरील जबाबदार वर्तन अशा विविध क्षेत्रात आपण आपले योगदान देऊ शकतात,असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप कुलगुरु डॉ. सपकाळ यांनी केला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# थोडक्यात

## भातपीक पिकून पिवळी पडली; परतीच्या पावसामुळे शेतकरी वर्ग चिंतेत

**अक्षराज : प्रमोद मौळे**



**दि.१५, जव्हार (पालघर) :** दसरा आला आणि गेला मात्र पाऊस उघडायचं नाव घेत नाही. संध्याकाळच्या वेळेत रोजच पाऊस पडत असल्याने शेतक-यांच्या नाका, तोंडाशी आलेली पिकं वाया जातात की काय.? अशी भीती शेतकऱ्यांना वाटायला लागली आहे. रोजच पाऊस पडत असल्याने शेतकरी वर्ग चिंतेत आहे. मात्र तरीही पाऊस उघडण्याचे नाव घेत नाही. शेतीत केलेली वर्षभराची मेहनत वाया जाते की काय.? अशी भीती शेतक-याना वाटायला लागली आहे. भात पिकं पिकून पिवळी पडली आहेत. पिके कापणीला आली आहेत. मात्र दुपारनंतर संध्याकाळच्या वेळी रोजच पाऊस येत असल्याने भात पिके कापावी की नाही. अशी चिंताशेतक-यांना असून वर्षभर शेतीत केलेली मेहनत, कबाडकष्ट वाया जातात की काय? अशा विवंचनेत शेतकरी वर्ग आहे. जव्हार हा डोंगराळ भाग असल्याने येथे पाऊसाच्या पाण्यावर अवलंबून असणारी हंगामी शेती केली जाते. मात्र यावर्षी दसरा संपला तरीही पाऊस उडण्याचे नाव घेत नसल्याने, तोडांशी आलेली पिकं सततच्या पाऊसाने नुकसान करण्यास सुरवात केली आहे. संध्याकाळच्या वेळी रोजच पाऊस येत असल्याने तोडांशी आलेली पिकांची नुकसान व्हायला सुरवात झाली आहे. पाऊस उघडेल कधी? अशी चिंता शेतकऱ्यांना आहे.

## विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण झाली पाहिजे - प्रदीप वाघ



**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.१५, जव्हार (पालघर) :** भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी केली जाते. याचे औचित्य साधून मोखाडा पंचायत समितीचे उपसभापतीप्रदीप वाघ यांनी खोडाळा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना समवेत वाचनाचा सराव केला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी वाचन केले. लहान मुलांना वाचनाची आवड निर्माण झाली पाहिजे. वाचल तरच वाचु असं म्हणताना डॉ.अब्दुल कलामांनी प्रचंड वाचनानेच भारतीय शास्त्रज्ञ ते भारताचे राष्ट्रपती झाले आणि देशाला जागतीक पातळीवर महत्त्वाचे स्थान प्राप्त करुन दिले आहे. यावेळी प्रदीप वाघ व शाळेचे शिक्षकराजा ठोमरे,वेंखंडे, उपसरपंच नंदकुमार वाघ उपस्थित होते.

## मंत्री छगन भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय वस्तू वाटप



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, विंचूर (नाशिक) :** येवला-विंचूर मतदार संघाचे आमदार छगनरावजी भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस विंचूर शहराचे पदाधिकारी यांनी छगनरावजी भुजबळ यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शालेय उपयोगी वह्या, पेन भेट स्वरूपात देण्यात आल्या. या सर्व शालेय उपयोगी वहया जिल्हा परिषद शाळेतील गरजवंत विद्यार्थ्यांना देण्यात आल्या आहे. यावेळी विंचूरचे प्रथम नागरिक सचिन दरेकर, पांडुरंग राऊत, विलास गोरे, महेंद्र पुंड, इस्माईल मोमीन, जयंत साळी, ओम राऊत, अनिल विंचूरकर, अमजद पठाण, मोसिन शेख, सोहेल मोमीन, निलेश सालकडे, गोरख सोनवने, धनंजय गांगुर्दे, सुनील नेवगे, गोविंदा हिरे व शाळेचे प्राचार्य व सर्व शिक्षक वर्ग आदि उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी कार्यालयात वाचन प्रेरणा दिवस साजरा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, अमरावती :** भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सूरज मडावी, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी श्री.कटियार यांनी, डॉ.कलाम यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीवर मात करीत उच्च शिक्षण घेत देशाच्या सर्वोच्च पद भुषविले. तसेच देशाच्या मिसाईल कार्यक्रमाची अंमलबजावणी केल्यामुळे त्यांना मिसाईल मॅन म्हणून संबोधले जात असल्याचे सांगितले. त्यांच्या स्मरणार्थ वाचन प्रेरणा दिवस राबविला जातो. तसेच वाचनामुळे माणसाचे व्यक्तिमत्व घडत असल्याने प्रत्येकाने वाचनाची सवय जोपासावी. यामुळे आत्मविश्वास वाढण्यास मदत होत असल्याचे सांगितले.